## वादीतर्फे साक्षीदार क्र. १ लताबाई नरोटे यांचा शपथेवर ज्यादाचा सरतपास वादीचे विधिज्ञ श्री. बी. एम. ठाकरे यांच्यातर्फे सुरु

१. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील सर्व मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला असून तो खरा व बरोबर आहे. मी प्रस्तुतकामी दि.३०.११.२०१८ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ चे वडील किसन भवानी उबाळे यांनी मला वाद मिळकतीचे बिनकब्जाचे साठेखत दुय्यम निबंधक, चांदवड यांच्यासमोर करुन दिलेले मूळ साठेखत दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझा अंगठा आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ चे वडील किसन भवानी उबाळे यांची सही आहे. ती मी ओळखते. त्यावर माझा व किसन उबाळेंचा फोटो आहे. त्याचप्रमाणे सदर साठेखतावर साक्षीदार म्हणून माझे पती बाळू त्र्यंबक नरोटे व विवेक हरीभाऊ क्षिरसागर यांची सही व फोटो आहे. सदर साठेखतावेळी दुय्यम निबंधकांसमोर हनुमान बाळू नरोटे व समाधान तुकाराम कोल्हे यांनी ओळख दिलेली आहे. साठेखतावर या सर्वांनी माझ्यासमक्ष सह्या केलेल्या आहेत. त्यावेमी मी तेथे समक्ष हजर होते. दुय्यम निबंधक, चांदवड यांनी त्यांच्यासमक्ष आमच्या सर्वांच्या सह्या घेऊन तो दस्त नोंदवला. त्या दस्तामध्ये चूक झाली होती. त्यामुळे दि.०६.११.२०१८ रोजी चूक दुरुस्ती लेख करण्यात आला. तो चुक दुरुस्ती लेख मला आता दाखवण्यात आला. त्यावर माझा अंगठा व किसन भवानी उबाळेंची सही, आमच्या दोघांचे फोटो व विकास हरीभाऊ क्षिरसागर व प्रल्हाद बाळू नरोटे यांनी त्यावर आम्हाला ओळखणार म्हणून सही केली आहे. त्या चूक दुरुस्ती लेखावेळी दुय्यम निबंधकांसमोर हनुमान बाळू नरोटे व समाधान तुकाराम कोल्हे हजर होते. त्या सर्वांनी सदर चुक दुरुस्ती लेखावर माझ्या समक्ष सह्या व अंगठे केलेले

आहेत. त्यानंतर दुय्यम निबंधकांनी तो दस्त नोंदवला. मूळ साठेखताला **निशाणी ३५** व चूक दुरुस्ती लेखाला **निशाणी ३६** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी अप्पर जिल्हाधिकारी मालेगाव यांचा वतन एस.आर. क्र. ६५/२०१८ मधील आदेशाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्याला **निशाणी ३७** देण्यात येते.

**ज्यादाचा सरतपास पूर्ण**

**प्रतिवादी क्र. १ विरुद्ध कैफियत नाहीचा आदेश पारित करण्यात आलेला आहे व प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी वादीचा दावा मान्य केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे विधिज्ञ श्री. एच.डी. घुले यांनी वादीचा उलटतपास घेतला नाही. प्रतिवादी क्र. १ पुकारता गैरहजर सबब प्रतिवादी क्र. १ विरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.11.24 17:12:35 +0530

दि. २४.११.२०२५.

चांदवड

(वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
चांदवड.